# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६
Website:www.unipune.ac.in.

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind,Pune-411007
Phone: 2025621346
E-mail: coe@unipune.ac.in


संदर्भ : परीक्षा/एस ॲण्ड टी/ 444

दिनांक : 22/03/2024

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक
सर्व संबधित संलग्न महाविद्यालये/मान्यता प्राप्त संस्था
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ पासून श्रेयांक पत्रकावर (Statement of Grade Sheet) पर्यायाधिष्ठीत श्रेयांक पध्दत (Choice Based Credit System) नुसार श्रेयांक नमूद करणेबाबत..

संदर्भ :– परिपत्रक क्र.११७/२०२० (सीबीएस/२९८, दि.१३ जून २०२०)

महोदय/महोदया,

पर्यायाधिष्ठीत श्रेयांक पध्दत (Choice Based Credit System) विविध विद्याशाखांच्या अभ्यासक्रमासाठी (UGC) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार लागू करण्यात आलेली आहे. पर्यायाधिष्ठीत श्रेयांक पध्दत (Choice Based Credit System) मधील नमूद केलेल्या नियम व अटींनुसार विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर करण्यात येतात. निकाल जाहीर करतेवेळी महाविद्यालयाकडे पाठविण्यात येणाऱ्या निकालपत्रकावर (Ledger) विद्यार्थ्यांने प्राप्त केलेले गुण व त्या अनुषंगाने मिळविलेले श्रेयांक (Credit) याचा उल्लेख करण्यात येतो.

विद्यार्थ्यांस वितरित करण्यात येणाऱ्या श्रेयांक पत्रकावर (Statement of Grade Sheet) पर्यायाधिष्ठीत श्रेयांक पध्दत (Choice Based Credit System) "नियम क्र. R 8.1 : The Semester end grade sheet will contain grades for the courses along with titles and SGPA .Final grade sheet and transcript shall contain CGPA" नुसार विद्यार्थ्यांने प्राप्त केलेले Credit & Grade Point नमूद करणे आवश्यक आहे. तसेच परिपत्रक क्र. ११७/२०२० दिनांक १३ जून, २०२० अन्वये विद्यार्थ्यांच्या (Passing Certificate) उत्तीर्ण प्रमाणपत्रावर त्याचा Class, Grade, Percentage of Marks नमूद करण्यात येईल असा उल्लेख केला आहे.

विविध परीक्षांसाठी श्रेयांक पध्दत विविध शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात आलेली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना वितरित करण्यात येणाऱ्या श्रेयांक पत्रकावर (Statement of Grade Sheet) छापण्यात येणाऱ्या निकालामध्ये प्रचालित कार्यपध्दती व प्रशासकीय एकसमानता व सुसूत्रता येण्यासाठी पुढील शैक्षणिक वर्षापासून सर्व विद्याशाखेच्या अभ्यासक्रमास नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी श्रेयांक पत्रकावर (Statement of Grade Sheet) पर्यायाधिष्ठीत श्रेयांक पध्दत (Choice Based Credit System) नमूद करणे आवश्यक आहे. त्याबाबतची अंमलबजावणी पुढील शैक्षणिक वर्षापासून सर्व विद्याशाखेच्या अभ्यासक्रमास नव्याने प्रवेश घेणाऱ्या

विद्यार्थ्यांसाठी करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या सभेमध्ये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा.परीक्षा व मूल्यमापन मंडळाने ठराव क्र.६५/२०२३ (२०.१०.२०२३) अन्वये मान्यता दिलेली आहे.

सबब आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष सन २०२४–२०२५ पासून सर्व विद्याशाखेच्या अभ्यासक्रमास नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या श्रेयांक पत्रकावर (Statement of Grade Sheet) पर्यायाधिष्ठीत श्रेयांक पध्दत (Choice Based Credit System) नुसार फक्त श्रेयांक नमूद करण्यात येतील. सदर आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा, ही विनंती.

कळावे,

आपला,

( डॉ. महेश काकडे )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ